# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०७/०३/२०२५ (शुक्रवार)**

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## १८ लाख ४९ हजार ३७० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०६/०३/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरेड विभागात पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, नागपूर ते उमरेड मार्गे ब्रम्हपूरी येथे टाटा हॅरीयर राखाडी रंगाची चारचाकी वाहन मध्ये प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. अशा माहिती वरून पोलीसांनी बायपास चौक, उमरेड येथे नाकाबंदी केली असता टाटा हॅरीयर एम एच ४४ एस ३८३८ ही गाडी येतांना दिसली. सदर वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये विक्रीसाठी वाहतुक होत असलेला महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले सुगंधित तंबाखु आढळुन आल्याने चालक आरोपी नामे अनूराग गौतम जांभूळकर, वय २८ वर्षे, आणि त्याचा साथीदार २. मंगेश दिलीप गेडाम वय २९ वर्षे, दोघेही रा. देलनवाडी वार्ड क्र. ०८ ब्रम्हपूरी जिल्हा. चंद्रपूर यांना विचारपुस केली असता सदर प्रतिबंधीत तंबाखुची वाहतुक ही गाडी मालक नामे रोहीत शिवनकर रा. तळोधी ता. नागभिड जि. चंद्रपूर याच्या सांगण्यावरून केली जात आहे अशी माहीती प्राप्त झाली.

आरोपीतांच्या ताब्यातून पीवळया रंगाच्या लहानमोठया बो—या मध्ये होला हूक्का शीशा कंपनीचा तबांखू १००० ग्रॅम चे एकूण २४० पॉकीटे किंमती १,९६,८०० /— रूपये, २. ३ पांढ—या रंगाच्या प्लास्टीक बो—यामध्ये इगल हूक्का शिशा टोबॅाको कंपनीचा सूंगंधित तंबाखू ४०० ग्रॅम वजनाचे एकून १९८ पॉकीटे किंमती

१,२६,७२०/— रूपये,३. एका पांढ—या रंगाच्या प्लास्टीक बो—यामध्ये मज्जा १०८ कंपनीचा सूगंधित तम्बाखूचे ५० ग्रॅम वजनाचे ११० लहान डब्बे किंमती २५,८५० /— रूपये, ४. गून्हयात वापरलेली चार चाकी टाटा हॅरीयर एम एच ४४ एस ३८३८ किंमती १५,००,०००/— रूपये असा एकून १८,४९,३७० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी नामे **१.अनूराग गौतम जांभूळकर, वय २८ वर्षे, आणि त्याचा साथीदार २. मंगेश दिलीप गेडाम वय २९ वर्षे, दोघेही रा देलनवाडी वार्ड क्र. ०८ ब्रम्हपूरी जिल्हा. चंद्रपूर आणि पाहीजे आरोपी रोहीत शिवनकर रा. तळोधी ता. नागभिड जि. चंद्रपूर** यांच्या विरूद्ध कलम १२३, २७४, २७५, २२३,३(५) ४९ भारतीय न्याय संहीता सह कलम अन्न सुरक्षा माणके अधिनियम २६ (२) (१),२६ (२) (४), (३) (१) (झेड झेड),२७ (३) (ई),३० (२) (ए) अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपी क्र १ आणि २ यांना पोलीसांनी अटक केली आहे.**

